Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# सेवाग्रामचा मेकओव्हर!

Jul 12, 2014, 01.57AM IST

67 Recommend 2 Tweet 0 +1 Comments

2 BHK Flat in Ambivali
"LaPromenade Ambivali" 37L Onwards! 2BHK Flat @ Ambivali By Axis Spaces : lapromenade-ambivali.in/2-BHK-Flat




म.टा. विशेष प्रतिनिधी, नागपूर

महात्मा गांधी यांचे वास्तव्य आणि स्वातंत्र्यसंग्राम चळवळीचे केंद्रबिंदू ठरलेल्या सेवाग्रामचा मेकओव्हर करण्यात येणार आहे. त्यासाठी तब्बल ५०० कोटी रुपयांची तरतूद सरकारने केली आहे. महात्मा गांधी यांच्या वर्धा जिल्ह्यातील आगमनाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. तसेच, २०१८ मध्ये त्यांची १५० वी जयंती राहील. या पार्श्वभूमीवर सरकारने योजना तयार केली असून वर्ध्याचे पालकमंत्री आणि अर्थ व नियोजन राज्यमंत्री राजेंद्र मुळक या समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांनी शुक्रवारी या योजनेचा रविभवनात आढावा घेतला. सेवाग्रामच्या ४९० कोटी रुपयांच्या योजनेला सरकारने मंजुरी दिली आहे. येत्या ९ ऑगस्टला मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते कामाला सुरुवात होईल. महात्मा गांधी यांचा विचारावर आधारित या स्थळाचा पर्यटन स्थळाप्रमाणे विकसित करण्यात येईल. नागपूर ते वर्ध्यापर्यंत गांधी विचार दर्शन उभारून नागरिकांना आकर्षित करण्यात येईल, अशी माहिती राजेंद्र मुळक यांनी दिली.

सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानच्या सूचनेनुसार सात कोटी रुपयांच्या कामाची सुरुवात जमीन हस्तांतरणानंतर आणि संकल्प चित्रानंतर कामाचे नियोजन करण्यात येईल. चार वर्षांत ही योजना तयार करण्याचे प्रयत्न आहेत. महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांनी वास्तव्य केलेले सेवाग्राम व पवनार आश्रमासह वर्धा जिल्ह्यातील २८ ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्याची योजना आहे, असेही मुळक यांनी स्पष्ट केले.

महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'गांधी फॉर टुमारो' या नावाने गांधी रिसोर्स सेंटर उभारण्यात येईल. पहिल्या टप्प्यात सेवाग्राम आश्रमाचा विकास करण्यात येईल. आश्रमाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता एकही वस्तू बदलण्यात येणार नाही. तसेच, नूतनीकरणदेखील करण्यात येणार नाही. आश्रमाच्या सहकार्याने परिसरातील संरक्षण भिंत, रस्ते, फुटपाथ, नई तालिम परिसरात सभागृह, यात्री निवासची डागडुजी व पर्यटनदृष्ट्या सेवा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही मुळक यांनी सांगितले. मुंबईतील विवेककुमार सल्लागार असून विकासाचे प्रारूप तयार करण्याच्या कामासाठी ठाण्यातील अडारकर असोसिएट्स-इपिकॉन्स कन्सल्टंट आणि मुंबईच्या इन्व्हारो डिझायनर्स या कंपन्यांची निवड करण्यात आली आहे.

मोबाइलवर ताज्या बातम्या, लेख, भविष्य, लाइव्ह स्कोअर पाहण्यासाठी क्लिक करा mtmobile.in वर

**2/3 BHK Project In Thane** - Premium Amenities @ Ghodbunder Road Pay "Only 2.99L on Booking"Call Now
**rustomjeeurbania-thane.in**
**3 BHK Flat in Palava City** - Casa Paseo Palava City 36L Onwards! Buy 3BHK Flat Sale in Palava City.
**lodhacasapaseo-palava.in/3BHKPalava**
Ads by Google

हा मजकूर फेसबुक वर शेअर करा — Tweet हा मजकूर ट्विट करा

Like 67 people like this. Sign Up to see what your friends like.

Download our Mobile apps: iPhone | Android

About Us | Advertise with Us | Terms of Use and Grievance Redressal Policy | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright © 2014 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768